केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना PMKSY- CADWM या योजनेसाठी SNA-SPARSH ही प्रणाली लागू करण्यासाठी केंद्र शासनाने सन २०२४-२५ मध्ये Mother Sanction मंजूर केलेल्या केंद्र हिश्श्याचे समरुप राज्य हिस्सा अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीजीएम-१०.२५/प्र.क्र.५९/अर्थ-१.
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०२५.

<u>**वाचा**</u>:- १) भारत सरकार यांच्या वित्त मंत्रालयाचे कार्यालयीन ज्ञापन F.No.१(२७)/PFMS/२०२०, दि.२१ मे,२०२४.
२) शासन निर्णय जलसंपदा विभाग क्रमांकः-बीजीएम १०.२४/(१५०/२४)/अर्थ-१, दि.१५.१०.२०२४.
३) जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश क्रमांक : N-19011/29/2017-CADWM/323-43, दि.१३.०२.२०२५.

<u>**प्रस्तावना**:-</u>

केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधीचे परिणामकारक व्यवस्थापन करणे, तसेच निधी विनियोगाच्या प्रक्रियेत अधिक परिणामकारकता आणण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने दि.२३ मार्च २०२१ रोजीच्या ज्ञापनान्वये सुधारित कार्यपद्धतीचा अवलंब करण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरून केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीसाठी Single Nodal Agency (SNA) ची नेमणूक करून त्या योजनेसाठी प्राधिकृत बँकेमध्ये स्वतंत्र Single Bank Account उघडणे आवश्यक होते.

२. दरम्यान, केंद्र शासनाने दि.२१.०५.२०२४ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये केंद्र पुरस्कृत योजनांचे निधी वितरण व विनियोग व्यवस्थापन (PFMS) करिता SNA- SPARSH अनुषंगाने Single Nodal Agency व Nodal Officer यांची नियुक्ती करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन वित्त विभागाच्या दि.११ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन परिपत्रकान्वये सुस्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यास अनुसरुन जलसंपदा विभागाशी निगडीत दोन केंद्र पुरस्कृत योजनांसाठी SNA- SPARSH अनुषंगाने Single Nodal Agency व Nodal Officer यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही दि.१५.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

३. SNA- SPARSH अनुषंगाने प्रत्येक प्रकल्पासाठी स्वतंत्र SLS Code तसेच लेखाशिर्ष घेण्यात आले आहे. नवीन SLS Code याचे SNA- SPARSH पोर्टलवर मॅपिंग करण्याची कार्यवाही सुरु आहे. दरम्यान, केंद्र शासनाने **PMKSY- CADWM** योजनेखाली कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना व गोसीखुर्द या दोन प्रकल्पांसाठी Mother Sanction दि.१३.०२.२०२५ च्या आदेशान्वये मंजूर केले आहे. सदर Mother Sanction च्या समरुप राज्य हिस्सा वितरण करण्याची बाब विचाराधीन आहे.

शासन निर्णय :

केंद्र शासनाने **PMKSY- CADWM** योजनेखाली कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना व गोसीखुर्द या दोन प्रकल्पांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या Mother Sanction/ केंद्र हिस्सा याचे समरुप राज्य हिस्सा रु.२३.७३५१ कोटी खालीलप्रमाणे SNA- SPARSH पोर्टलवर वितरण करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

अ.क्र.	**लेखाशिर्ष राज्य हिस्सा**	**प्रकल्पनिहाय SLS code**	**प्रकल्पाचे नांव**	**Mother Sanction (केंद्र हिस्सा) (रु.कोटी)**	**समरुप राज्य हिस्सा (रु.कोटी)**	**भारतीय रिझर्व बँक Mumbai Regional Office SNA- SPARSH खाते क्रमांक.**
१	४७०५ ००४४	MH ६२६	कृष्णा कोयना उंसियो	८.१६८५	७.९१४३	०१५८५९०१४७५
२	४७०५ ००६२	MH ६३१	गोसीखुर्द	१७.४०९२	१५.८२०८	०१५८५९०१४७१
एकूण				**२५.५७७७**	**२३.७३५१**	

२. सदर योजनेसाठी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दि.११.१०.२०२४ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दि.१२.०२.२०२३ मधील नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून निधी वितरण करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०३२८१११२२२५०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SATISH KARBHARI JONDHALE

Digitally signed by SATISH KARBHARI JONDHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=96b5b527d7131539d3b3eb3ba523bb3514dd3d3437a78ac0f73c6d8043215729, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0627620672613CBEF6F2C00D1E97183870A4A77839246128DCAA5D4831FF2947, cn=SATISH KARBHARI JONDHALE
Date: 2025.03.28 11:13:11 +05'30'

(सतिश जोंधळे)
आं.वि.स. व स.स., महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२) महालेखापाल १/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
३) अ.मु.स., जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव(प्र.स./ लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
६) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
७) उपसचिव, (निवसं/लाक्षेवी), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) Asst.State Nodal Officer, State Directorate, PFMS, Maharashtra.
९) वित्त विभाग (व्यय-१२/अर्थ-१०/अर्थोपाय/साउ/अर्थबळ), मंत्रालय, मुंबई
१०) नियोजन विभाग (कार्यासन १४३३) मंत्रालय, मुंबई,
११) अर्थ-१/ कार्यासन संग्रहार्थ.